# कोण काय सांगते ?





जीभ चव सांगते.
कैरी आंबट आहे की तुरट आहे ?
कैरी जिभेवर ठेवली की समजते.
जिभेवर ठेवली की साखर गोड आहे हे कळते.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई ४००००५.
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
(विद्याभारती) पुणे ४११०२९.

आंबट, खारट, गोड, कडू, तुरट ह्या चवी जिभेमुळे समजतात.



नाकाने वास कळतो.
फुलांचा वास येतो. मोहोराचा वास येतो.
आंबा पिकल्याचा वास येतो. भाकरी करपली
हे वासाने कळते.



कानाने आवाज ऐकू येतो.
रामू ओरडला की सखू ओरडली ते समजते.
पंप चालू आहे की बंद आहे?
खिशातून पैसे पडले की डबी पडली?
नुसत्या आवाजावरुन ओळखता येते
आवाज पुढून येतो आहे की मागून?
हे सांगता येते.





आपल्याला डोळ्यामुळे दिसते.
डोळे मिटले तर काहीच दिसत नाही.
डोळ्यामुळे फुलांचे रंग दिसतात. पानांचे आकार दिसतात. एस्‌टीची बस आली की नाही? ती किती लांब आहे? हे दिसते.

सदरा ओला आहे का? सदरा अंगात चढवला की समजते. रामूला ताप आला आहे. हे रामूच्या कपाळावर हात ठेवला की कळते. आपल्या अंगावर कातडी असते. गुळगुळीत, मऊ, खडबडीत, टोकदार, धारदार, गरम, थंड असे फरक कातडीमुळे कळतात.



सांगा पाहू हे पदार्थ कसे लागतात.



तुमच्या गावात कोणती फळे पिकतात ? त्यांच्या चवी कोणत्या ?

---

तुम्ही डोळे मिटून पाच मिनिटे बसा. कोणकोणते आवाज कानावर पडतात ते ऐका. कसले आवाज आहेत ते सांगा.

---

एका पिशवीत पेन्सिल रबर नाणे दोरा खिळा अशा काही वस्तू घ्या. डोळे मिटा. ह्या वस्तू हाताने ओळखता येतात कां ?

---

घरातून शेतात - मळ्यात जाईपर्यंत तुम्हाला काय काय दिसते ते सांगा.

---